ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

ISSN 2319-8648

# Current Global Reviewer

International Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Editor In Chief

Arun B. Godam

Dec - 16 - (6)


# Current Global Reviewer

ISSN 2319-8648

International Research Journals Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr. Arun B. Godam

Vol I Issue VIII, Year IV ( Half Yearly) May. 2016 to Oct . 2016



**Editorial Office :**

Khadgaon Road, Kapil Nagar, Latur, Dist. Latur 413512 (M.S.) India.

**Contact :-**

Arun B. Godam

8149668999, 8483959442

**E-mail :**

hitechresearch11@gmail.com.



**EXECUTIVE EDITORS**

Dr. Hanumant Mane
R.Guide & Head, Dept. of Marathi,
Shivchatrapati College.
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

Dr. N.J. Waghmare
Res. Guide & Head Dept. of Pali,
Govt. Sanatketar College,
Shivani. (M.P.)

Dr. U.T. Gaikwad
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

Dr U.V.Panchal
H.O.D, Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

Pro. S.B. Karande
Dept. of Economics,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

Dr M.U. Yusuf
Assistant Professor,
Dept of Commerce,
Sir Sayyed College
Auranbadad, Dist. Aurangabad

**DEPUTY EDITORS**

B.J. Hirve
Dept. of botany
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)

S.M. Bansode
Dept. of Sociology,
Shri Shiv Shahu Mahavidalaya,
Sarud, Tq. Shahuwadi, Dist. Kolhapur

Maimanat Jahan Ara
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

Dr. B.T. Lahane
Principal, Head, Dept. of English,
Sambhajirao Kendre College,
Jalkot Dist. Latur (M.S.)



Shaurya Publication,
Latur

Price : Rs. 250/-

www.rjournals.co.in



ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

ISSN - 2319- 864
Vol I Issue VIII, May 2016 to Oct. 2016

# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Comparative Income Statement of Maharashtra State Agricultural Marketing Board | Dr. Awade N. H.<br>Prof.Kawade V.P | 5-7 |
| 2 | 'Sustainable Economic Development – A scenario to enhance environmental issues in Indian perspective' | Dr. S. L. Soni | 8-10 |
| 3 | A Study On Shri Kshetra Siddhagiri Math: A Role Model | Prakash T.Waghmare<br>Tushar T. Waghmare | 11-15 |
| 4 | Recommendations Of The mandal Commission for the Other Backward Classes: A Sociological Study | Shri. Bansode S. S. | 16-22 |
| 5 | Issues and Problems : Dalit Literature | Shinde Sachin | 23-25 |
| 6 | Politics of PWP in Maharashtra | Dr. Sanjivan M. Kadam | 26-30 |
| 7 | Psychodynamic theory development in Educational | Dr. Shinde Sushil Sheshérao | 31-34 |
| 8 | "प्रेमचन्द की कहानियों में व्यक्त विभिन्न समस्या" | प्राचार्य डॉ. गणपत श्रीपतराव माने | 35-40 |
| 9 | मानवाधिकार संरक्षण के क्षेत्र में गैर सरकारी संगठनों की भूमिका | गाधव शिंदे | 41-45 |
| 10 | शाश्वत विकासाकरीता ग्रामीण महिला सशक्तता साखळी | प्रा.सुरवसे ए.पी. | 46-49 |
| 11 | ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका | प्रा.राठोड एस.के. | 50-56 |
| 12 | श्री. दत्त र. कवठेकर : एक अभ्यास | विळुरे श्रीदेवी रामचंद्र | 57-60 |
| 13 | नागरी समाज आणि लोकशाही समोरील आव्हाने | प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबूराव | 61-70- |


Degloor College, Degloor
Dist.Nanded

...VIEWER ISSN - 2319- 8648
Vol. I Issue VIII, Mar 2016 to Oct 2016

# नागरी समाज आणि लोकशाही समोरील आव्हाने

प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबूराव
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

13 Research Paper - Political Sci.

लोकशाही जगातील सर्वोत्तम शासन प्रकारआहे. पंरतु तो प्रत्येक देशात सारख्याच प्रकारात चालत नाही. जगातील विविध देशात लोकशाहीचे होणारे संचलन पाहता त्यात सुधारणा व संशोधनाची आवश्यकता आहे. लोकशाही ही एक प्रक्रिया आहे. ती एकाएकी व तात्काळ रुजत नाही. कारण एकमत व एकवाक्यता हा लोकशाहीचा मुळ आधार आहे आणि ते होण्यास वेळ लागतो. भारताने 1950 पासून लोकशाहीचा शासन व्यवस्था व जीवनप्रणाली म्हणून स्विकार केला. भारतातील बहुपक्ष पध्दतीने समाजातील प्रत्येक घटकांना आपले मत मांडण्याची व शासनात सहभागी होण्याची संधी दिली. यामुळे भारतात 70 वर्षात लोकशाही प्रक्रियेने वेग घेतला आहे. मागील 70 वर्षाकडे पाहता हे स्पष्ट होते की, भारतात लोकशाहीची पाळेमुळे मजबुत झाली आहेत. 2014 च्या लोकसभा निवडणूकीत एकाच पक्षाला मिळालेल्या स्पष्ट बहुमताने ते अधिक स्पष्टच केले. पंरतु भारतीय लोकशाही परिपुर्ण आहे का ? या प्रश्नाचे उत्तर सध्यातरी नाहीच असे दयावे लागेल.

शितयुध्दांच्या अंतानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक, राजकीय व व्यापारी क्षेत्रात आमुलाग्र परिवर्तन झाले. या परिवर्तनाने लोकशाहीचा मार्ग बऱ्याच देशात सुखकर झाला. जग दोन महासत्ताक देशांच्या आपसी संघर्षातून मुक्त झाले. अमेरिका आणि सोव्हिएत रशिया यांना सोडून जगात इतरही देश आहेत. त्या देशांच्या विकासाकडे लक्ष देणे आपल्या विकासासाठी क्रमप्राप्त असल्याचा विचार विकसित देशामध्ये रुजवण्यास सोव्हिएत रशियाचे पतन व L.P.G. च्या धोरणाचे सार्वत्रिकरण या घअना महत्वाच्या ठरल्या. या दोन्ही घटनानी खऱ्या अर्थाने जागत लोकशाहीची पाळेमुळे मजवुत केली. तर दुसऱ्या बाजुने लोकशाही शासनव्यस्थेत काही नवीन घटना व प्रवृत्तींच्या उदय व विकास

झाला. ज्यामुळे लोकशाहीचे महत्व अत्यधिक वाढले. परिणामतः Non State Actors सारख्या संस्था सशक्तपणे उदयास आल्या. ज्यात नागरी समाजाचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल.

भारतासारख्या लोकशाही देशात, वाढत्या समस्यांना गांभीर्याने लोकमनापर्यंत पोहचवून एक सशक्त संघटना निर्माण करण्यात नागरी समाजाने महत्वपुर्ण भुमिका बाजवली. ज्यामुळे शासनाने या सर्व समस्यांचा सामना करण्यासाठी काही कायदे बनवले. ज्यात माहिती अधिकाराचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. तसेच लोकपालाबाबत तीव्र चळवळ अण्णा हजारे व अरविंद केजरीवालच्या नेतृत्वात उभी राहीली. तर बाबा रामदेवने काळया पैश्या विरुध्द आंदोलन उभे कले. या सर्व प्रश्नांबाबत जनतेत जावून लोकसंघटन उभे करणे व शासनावर दबाव टाकण्यात नागरी समाजाने महत्वाचे काम केले. नागरीक समाजाकडून संवेदनशील व आम आदमीच्या हिताशी संबंधित मुद्यावर आवाज उठवणे लोकशाही व कल्याणकारी राज्याच्या यशस्वितेसाठी महत्वाचे आहे. अलिकडेच भारताने माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महत्वाची प्रगती केली. ज्यामुळे अमेरिकासारख्या देश भारतासोबत जवळीकता निर्माण करतो. या माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या बदलाचा अचूक फायदा नागरी समाजाने घेतला परिणामतः नागरी समाजास नवी दिशा प्राप्त झाली.

प्रस्तुत लेखात नागरी समाज आणि लोकशाही या परस्पपूरक संकल्पना व त्यांच्या समोरील आव्हानांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला. ज्यासाठी ग्रंथालयीन, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अभ्यास पध्दतीचा आधार घेण्यात आला. नागरी समाज लोकशाहीला जीवनप्रणाली बनवण्याचे साधन आहे. तसेच लोकशाहीच्या यशस्वितेतील एक महत्वाचा घटक आहे. वर्तमानात लोकशाही व नागरी समाजास काही समान समस्यांचा सामना करावा लागत आहे. या गृहितकास प्रमाण मानून प्रस्तुत विषयावरची मांडणी करण्यात आली. तत्पुर्वी नागरी समाज व लोकशाही या संकल्पना स्पष्ट करुन त्यातील सहसंबंधाचे विश्लेषण करण्यात आले. या विश्लेषणास स्पष्ट करण्यासाठी संदर्भ ग्रंथ, संबंधित विषयावरील पुस्तके, नियतकालिक व वर्तमानपत्राचा आधार घेवून तथ्य संकलन करण्यात आले. लोकशाही व नागरी समाजातील आंतरसंबध व त्यासमोरील समस्या जाणून घेण्याच्यादृष्टीने या शोधनिबंधाची महत्ता आहे.

लोकशाही शासन व्यवस्थेचे अभ्यासक व प्रशंसकानी हे मान्य कले की, मानवाच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी लोकशाही एक उत्तम व योग्य शासन व्यवस्था आहे. या लोकशाहीला अत्यधिक सक्षम व सफल बनवण्यात कल्याणकारी राज्याने महत्वाची भुमिका बजावली. आधुनिक युगातील लोकशाही शासन व्यवस्थेचा अर्थ स्पष्ट करण्यात पाश्चिमात्यासह भारतीय अभ्यासकांनीही महत्वाची भुमिका बजावली. लोकशाही हा एक असा शासनप्रकार आहे, ज्यात शासनाची सर्वोच्च सत्ता कोण्या एका विशिष्ट वर्गाच्या हातात नसून संपूर्ण लोकांच्या हातात असते. लोकशाहीबाबत अमेरिकन राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकनने स्पष्ट केले होते की, लोकांनी, लोकांसाठी, लोकांकडून चालवलेला शासन प्रकार म्हणजे लोकशाही होय. लोकशाही नागरिकांनी स्थापन केलेली

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

सुदृढ शासन व्यवस्था आहे. यात स्थापन झालेली शासन यंत्रणा लोकांच्या सहकार्याने चालते. लोकशाही शासन व्यवस्थेचा उदय व विकासात अनेक पाश्चिमात्य व भारतीय विचारवंतांचे योगदान आहे. इंग्लंडला संसदीय लोकशाहीचे जनक म्हणतात. तसेच प्लेटो, ॲरिस्टॉटल, मॅकेव्हली, थॉमस हॉब्ज, जॉन लॉक, जिन जॅक्स रुसो, कार्ल मार्क्स, हेगेल, बेंथम, मिल, लास्कीसह, महात्मा गौतम बुध्द, महात्मा बसवेश्वर, संत कबीर, वारकरी संत, अण्णाभाऊ साठे, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकरासह अनेक भारतीय व पाश्चिमात्य अभ्यासक व विचारवंतानी लोकशाहीला मजबुत करण्यात महत्वाचे योगदान दिले. या सर्वांनी प्रत्येक व्यक्तिचे नैसर्गिक अधिकार, लोकांची न्याय भावना, शासनाचा आधार लोकमान्यता, लोकांचा शासनात सहभाग या सर्वांना मान्यता देवून लोकशाहीस पूरक अनेक तत्वाचा विकास केला. ज्यातून लोकशाहीच्या संसदीय लोकशाही, अध्यक्ष लोकशाही, प्रत्यक्ष लोकशाही व अप्रत्यक्ष लोकशाही या विविध संकल्पनांचा उदय झाला. शुंपीटर, रॉबर्ट ढाल, नववार्क्सवादी या सर्वांनी लोकशाहीला शितयुध्द व शितयुध्दोत्तर काळात मजबुत करण्यात महत्वाचे योगदान दिले. भारतातही महात्मा गांधीनी अहिंसात्मक समाज व सत्याग्रही, फुलेचा सत्यशोधकी समाज, बसवेश्वरांचा शरण व समताधिष्ठित समाज या माध्यमातून लोकशाही व नागरि समाजाची स्थापना केली. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना व राज्य समाजवादातून लोकशाहीला मूळ रुप देवून ते भारतीय समाज व्यवस्थेत रुजवण्याचे काम केले.

हुकूमशाहीला सहभागी लोकशाहीपासून आमच्या गावात आमचे सरकार, आमच्या गावात आम्हीच सरकार येथपर्यंत घेवून जाण्यात नागरी समाजाची भूमिका सक्रिय बनली. ज्यामुळे लोकशाहीत निम्न स्तरातील लोकांचा सहभाग वाढला. या सहभागामुळे लोकशाहीस खरे स्वरुप प्राप्त झाले. लोककल्याण करण्यासाठी लोकशाहीची रुजवणूक आवश्यक आहे. या विचाराने प्रेरित होवून नागरि समाज युरोपमध्ये कार्य करु लागला. ज्याचा प्रारंभ साधारणत: 18 व्या शतकात झाला. हेगेलने आपल्या विचारात त्याचे स्पष्टीकरण केले. हेगेलने नागरि समाजाचे केलेली विवेचन प्लेटो, ॲरिस्टॉटल, महात्मा गौतम बुध्द, महात्मा बसवेश्वर, जॉन लॉक, रुसो यांच्या विचारातही दिसून येते.

नागरि समाजाबाबत केलेले विवेचन निरंकुशतावाद आणि नैसर्गिक समाजाच्या उलटे असते. मॉटेन्स्क्यू, जॉन लॉक, हेगेल यांच्या राजकीय विचारातील नैसर्गिक समाज, सामाजिक समाज, राजकीय समाज आणि त्यातील व्यक्तिच्या संघटनातून होणारा राज्याचा उदय जो नागरि समाजाचा अविष्कार असल्याचे स्पष्ट करतात. याचा विचाराला पुढे नेताना कार्ल मार्क्सने थोडीसी वेगळी मांडणी केली. त्याच्यामते नागरि समाजाच्या विकासाने भांडवलवादाचा धोका वाढतो. तर नव मार्क्सवादयांनी त्यात भर टाकताना स्पष्ट केले की, नागरि समाज संस्कृती

ISSN - 2319-8648
Vol I Issue VIII, May 2016 to Oct. 2016
AJIT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

व विचारधारेच्या आत येवून तो एक मध्यस्थ म्हणुन काम करतो. तर उदारमतवादी म्हणतात की, राज्य नागरि समाजाच्या प्रभुत्वाखाली रहाते. अनेक सत्तावादयांच्या मते नागरि समाजाअंतर्गत सर्व प्रकारच्या संघटना, समुह व सामाजिक घटना व क्रियांचा समावेश असतो. ज्यावर राज्याचे नियंत्रण संभव नाही. नागरी समाजाअंतर्गत स्वायत्त संस्था, व्यापारी संघटना, शिक्षण संस्था,युवक संघटना, दबाव गट व बिगर शासकीय सामाजिक संघटनाचा समावेश होतो. या सर्व संस्था शासनास पुरक कार्य करतात. यांचे स्वरुप सामाजिक, राजकीय असते. या शासनात प्रत्यक्ष सहभाग न घेता शासनावर दबाव टाकून लोककल्याणाचे कार्य करतात किंवा ते कार्य करण्यास शासनास मदत करतात. समाजातील कमकुवत घटकांचे प्रश्न व मागण्या शासनासमोर मांडणे, लोकल्याणाप्रति शासनास जागरुक करणे. सर्व सामान्य नागरीकांच्या राजकीय, प्रशासकीय, आर्थिक सहभागास वाढवणे, शासनाच्या धोरण निर्धारणात सहभागी होण्याचा प्रयत्न करतात. परंतु काही नागरी समाजातील संस्था, व्यक्ति व कार्यकर्ते नागरि समाजाचे नाटक करुण लोकभावनेला अधिमान्यतेत रुपांतरीत करुन लोकशाहीच्या चौकटीत राहुन सत्त मिळवतात व शासनकर्ते बनतात. याचे उत्तम उदाहरण अरविंद केजरीवाल व त्यांचा समुह, किरण बेदी. तर नागरी समाजातील एक वर्ग असाही असतो की जो सर्व शासकीय,प्रशासकीय लाभ बाजुला सारुन लोककल्याणासाठी जनतेचे प्रश्न सोडविण्यात व लोकांना जागृत. करण्यात स्वतःचे जीवन व्यथित करतो. ज्यात अरुणा रॉय, मेधा पाटकर,बाबा आमटे. अण्णा हजारे यांचा उल्लेख करावा लागेल.

लोकशाही व नागरी समाज वर्तमानात लोककल्याणाच्या प्रश्नास शासन दरबारापर्यंत पोहचवण्यासाठी आवश्यक आहेत. लोकशाहीला लोककल्याणकारी राज्याच्या दिशेने घेवून जाणारा नागरी समाज एक मार्ग आहे. नागरि समाजाच्या माध्यमातून लोकशाही मुल्यांचा प्रचार होत आहे. नागरि समाज व्यावसायिक व यांत्रिक संघटनांना मानवीय मुल्य, लोकविकासाशी जोडण्याचा प्रयत्न करत आहेत. तसेच लोकांत जागरुकता व चैतन्य निर्माण करुन भ्रष्टाचारविरोधी वातावरणाची निर्मिती करत आहेत. पारदर्शक शासन, जबाबदेही शासन नागरी समाजाचा हेतू आहे. नागरी समाज शासन, प्रशासन व समाजातील विविध घटकांत पारदर्शकता आणून त्यांना लोकांचे प्रश्न जाणून घेवून ते सोडविण्यासाठी उदयुक्त करत आहेत. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक स्तरावर आर्थिक, राजकीय सामाजिक, सांस्कृतिक व क्रिडा क्षेत्रात नागरीकांची क्रियाशीलता वाढवण्यासाठीचे सकारात्मक प्रयत्न नागरी समाज करत आहे. नागरी समाज लोकांत उत्तरदायित्वाची भावना विकसित करतो. शासन व प्रशासनात लोकांचा सहभाग वाढवून दोघांची गुणवत्ता (शासन व नागरीक) वाढवण्याचा प्रयत्न नागरि समाजाकडून होताना दिसतात. शासन व जनतेत सकारात्मक आणि चांगले संबध निर्माण करण्यात नागरि समाजाने सकारात्मक पाऊल उचलले. जे मध्यंतरीच्या काळात धुसर झाले होते. नागरि समाज समाजातील अंतरविरोध व कलहाचे भाव

ISSN 2319 8648
Vol I Issue VIII, May 2015 to Oct. 2015
ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

बाजूला सारुन सर्वांना एकामुठीत घेवून विकास साधण्यात सक्रिय बनत आहे

आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील नवनवीन सामाजिक चळवळीचा जनक नागरी समाज आहे. जो पर्यावरण, मानवी हक्क, लिंग समानता, संधीची समानता, शाश्वत विकास, भ्रष्टाचारमुक्त व्यवस्था व भारत, व्यसनमुक्त समाज या मुद्यांशी लढण्यासाठी पोषक वातावरण बनवतो. शासन व प्रशासकीय स्तरावरील माहिती जाणून घेण्याचा लोकांचा घटनात्मक व लोकशाहीत्मक हक्क आहे. तो मिळवण्यासाठी लोक संघटनांचा दबाव शासनावर टाकण्यात नागरि समाजाला यश येत आहे.

नागरि समाजात समाजातील सर्वच घटक येतात. नागरि समाज समाजाचे संघटित स्वरुप आहे. ते स्वतंत्र व जबाबदार आणि उत्तरदायी संघटन आहे. जे संघटकांचे स्वातंत्र्य, विचारांचे स्वातंत्र्य, नागरी व समाजाच्या आर्थिक अधिकारास स्पष्ट करते. समाजात नैतिकता, सभ्यता व सांस्कृतिक मुल्यासहित सहकार्याच्या भावनेला विकसित करणाऱ्या सभ्य समाजाचे लक्षण म्हणजे नागरि समाज होय. ज्याचे लक्ष्य सर्वांगिण कल्याण असते. ते निरंकुशकता व शोषण आणि सत्तेच्या मस्तवालपणास विरोध करते. राजकीय, प्रशासकीय व इतर अनेक प्रकरणात नागरिकांच्या भागीदारीचा मार्ग मोकळा करण्यांची यंत्रणा म्हणजे नागरि समाज होय. राज्याचे वर्चस्व व प्रभुत्व अमान्य करुन अनेकसत्तावादाचे समर्थन करते. राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक विषयांना उचलून लोकमत जागृत करण्याचे काम नागरि समाज करते. नागरि समाज शासन, प्रशासनाच्या यंत्रणेवर निगरानी ठेवणारे यंत्र आहे. समाजात राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व आर्थिक विषयावर जागरुकता उत्पन्न करते. सामाजिक व आर्थिक विकासाबाबत लोकांना संघटित व गतिशील करते.

लोकशाही आणि नागरि समाज या दोन्ही सर्वोत्तम संकल्पना व समान ध्येयाने काम करणाऱ्या स्वतंत्र व्यवस्था ओहत. याचा अर्थ त्यात काहीच दोष नाहीत असे नाही. या दोन्ही व्यवस्थांना बऱ्याच दोषांनी ग्रासलेले आहे. त्यामुळे त्या दोघांनी मिळून परस्परातील दोष दुर करुन सुधारणा करण्याचा प्रयत्न करतात. लोकशाही आणि नागरि समाजात अनेक सुधारणा काळाच्या ओघात झाल्या त्यामुळेच त्याचे हे प्रगल्भ व विकसित स्वरुप आपणास आज दिसते. या सर्वमान्य व श्रेष्ठ व्यवस्था अतिउत्तम बनवण्यासाठी त्यांच्यापुढे असणाऱ्या आव्हानांना समजून घेवून एक आदर्श नागरिक म्हणून या आव्हानांना दुर करण्याच्या नागरि समाजाच्या प्रक्रियेत सम्मीलित होवून लोकशाहीचा मळा फुलवू या. तत्पुर्वी लोकशाही व नागरी समाज खालील आव्हानांच्या कचाट्यात सापडून स्वतःचे अस्तित्व कसे गमावत आहेत ते समजून घेवूया.

## 1) राजकारणाचे गुन्हेगारीकरण :

राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी रणनीति आखण्याचे काम राजकारणात अपेक्षित आहे. राजकारणात सामान्य

Bapuri Education Society's College, Degloor Dist.Nanded

व आदर्श समाज रचनेची निर्मिती करण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु वर्तमान लोकशाहीत राजकारणाचे व्यावसायीकरण व त्याचे गुन्हेगारी करणात रुपांतर झाल्याचे दिसते. ज्यास नागरि समाजही नष्ट करु शकत नाही. उलट नागरि समाज राजकारणाच्या गुन्हेगारीकरणास कंटाळून स्वतःच राजकारणातून निवृत्ति तरी घेतो किंवा त्यात सामील होतो. राजकीय पक्षामार्फत सत्तेची समीकरण साधण्यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तिची निवड करतात. राजकारणाला सौदेबाजीचे रुप येणे गुनहेगारांच्या लोकानुरंजनवादासाठी उपयुक्त ठरत आहे. बहुमतासाठी अशाच व्यक्ति व पक्षांची साथ घेतली जाते. सत्तेत रहाणे, मंत्री पद मिळवण्यासाठी आपल्या सिध्दांत व विचाराशी समझोता केला जातो. त्यामुळे भ्रष्ट व्यक्तीचा सुळसुळाट झाला. यासाठी राजकीय पक्षांनी राष्ट्रीय हिताचा विचार करुन भुमिका घ्यावी. अशी भुमिका घेणाऱ्यांनी नागरी समाजाचा आधार घेवून विकास व लोककल्याणाच्या कार्यक्रमाची आखणी करावी. ज्यामुळे लोकशाहीतील लोकांचा विश्वास दृढ होईल.

**2) राजकीय पक्ष पध्दती :**

राजकीय पक्ष लोकशाहीचे संचलन करतात. लोकशाहीची चाके म्हणून राजकीय पक्षांना मान्यता मिळाली आहे. परंतु भारतात हीच पक्षीय व्यवस्था लोकशाहीपुढील आव्हान बनले आहे. कारण या राजकीय पक्षांनी देशातील गरीब व कमकुवत लोकांना लोकशाही, मतदान या प्रती कधीच शहाणे होवू दिले नाही. उलट त्यांना जात,धर्म, नोटा, बाटली,कोबंडी यांच्या फंदयात ठेवून त्यांची मती भ्रष्ट केली. या मतभ्रष्टतेमुळेच लोक आपला योग्य प्रतिनिधी निवडू शकत नाहीत. बहुपक्षपध्दतीमुळे लोकशाही मुल्यांची रुजवण होते. लोकांचा सहभाग वाढतो. परंतु बहुपक्षपध्दतीमुळे होणाऱ्या मतांच्या विभागणीने सत्तेत येणारा पक्ष अल्पमताचा प्रतिनिधी बनतो. या धोक्यास संपवण्यासाठी भारताने राष्ट्रीय स्तरावर व्दिपक्षपध्दती आणि राज्यस्तरावर एक पक्ष पध्दतीचा स्विकार करावा. ज्या राजकीय पक्षाला अधिक मतदान मिळेल तो पक्ष सत्तेत येतो. परंतु त्यास बहुमत मिळालेच पाहिजे अशी अट नाही. राजकीय पक्ष व उमेदवाराची वाढती संख्या व मताच्या विभागीणमुळे सत्तेत येणारा पक्ष व उमेदवार खरेच बहुमतातीलच आहे का ? हे निश्चित सांगता येणार नाही. निवडणूकांच्या निकालांचे विश्लेषण करता हे स्पष्टपणे जाणवेल की, निवडून आलेल्या उमेदवारास मिळोलली मते त्यांच्या विरोधात पडलेल्या मतापेक्षा कमी आहेत. ज्या राजकीय पक्षाच्या उमेदवारास व पक्षास मानणाऱ्याचे प्रमाण फारच अत्यल्प असते त्याच उमेदवारास व राजकीय पक्षास लोक निवडून देतात. कारण योग्य पर्यायाचा अभाव, उमेदवाराची वाढती संख्या, जातीय, धर्मीय समीकरणामुळे असे घडते, अशा व्यवस्थेस लोकशाही व्यवस्था म्हणाये का ? अशा व्यवस्थेत नागरी समाजाला बदल घडवणे शक्य होईल का ? नागरी समाजाला जात,धर्म,वंश, प्रदेश,लिंग, अर्थिक विषमता यासह अनेक विषमता आणि अज्ञानी मानसिकतेचा सामना करुन भारतीय लोकशाहीला सुदृढ व सक्षम बनवण्याचे

ISSN - 2319- 8648
Vol I Issue VIII, May, 2016 to Oct 2016
ADARSH VIDYA EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

आव्हान सक्षमपणे पेलावे लागेल.

**3) आघाडी शासन व्यवस्था :**

1990 पासून 2014 पर्यंतच्या भारतीय लोकशाहीवर नजर टाकता अस्थिर शासन, आघाडीचे शासन ही एक प्रमुख समस्या पुढे आल्याचे स्पष्ट चित्र दिसते. राज्यशास्त्रात अनेक अभ्यासक व विश्लेषकांनी त्याबाबत मांडणी केली. राजकीय पक्षात आघाडी निवडणूक पुर्व, निवडणूकानंतर किंवा विशिष्ट कार्यक्रमाच्या आधारावर होते. या आघाडी धर्माचे पालन सर्वच राजकीय पक्षाकडून प्रामाणिकपणे होईल याची शक्यता नसते. बऱ्याचदा ते स्वतःच आघाडीचा धर्म मोडून विरोधात प्रचार व काम करतात आणि पुन्हा आघाडीचा धर्म असल्याचे सांगतात. परस्पराविरोधात आरोप-प्रत्यारोपाचे राजकारण करतात. तेच पक्ष निवडणूकीनंतर सत्तेची गाठ व्यवस्थित ठेवणे (बांधण्यासाठी) एकत्रित येवून जनतेचा विश्वासघात करतात. लहान राजकीय पक्ष निवडणूकीत ज्यांच्या विरोधात प्रचार करतात निवडणूकीनंतर त्याच्याच गटात जातात.निवडणूकीनंतरच्या आघाडीचा उद्देश लोकसेवा नसून सत्तेचे समीकरण साधून आपला स्वार्थ व हेतू पुर्ण करण्याचा आहे. प्रसंगी आपल्या वैचारीक सिध्दांताशी तडजोड करण्याची मानसिकता दर्शविलेली जाते. याचा अर्थ अशा आघाडया लोकांसोबत केलेला धोका, लोकशाहीची उडवलेली खिल्ली आहेत. लोकशाहीत शासनाचे संचलन करणाऱ्या उमेदवाराची निवड करण्याचे सुत्र मतदार राजाच्या हातात नसतात. ते त्या राजकीय पक्षाच्या अध्यक्षाच्या हातात असते. तो ज्या व्यक्तीला उमेदवारी देईल त्यालाच निवडून देण्याचे जनतेच्या हातात असते. जनता एकही उमेदवार लायक नसेल तर नोटा बटन दाबते तर काहीवेळा मतदान न करता मतदानाचा दिवस पिकनिक डे म्हणून साजरा करते. यापेक्षा दुर्दैव म्हणजे बऱ्याचवेळा पक्षासच माहित नसते उमेदवार कसा आहे. तर लोकांना काय कळते.

**4) जागरुक जनमताचा अभाव :**

भारतीय लोकशाही आणि नागरि समाजाची संपूर्ण भिस्तच लोकजागृतीवर आहे. परंतु वास्तवतेत भारतात जागरुक जनमताचा अभाव आहे. त्यामुळे या दोन्हीना या समस्येचा सामना करावा लागेल. शिक्षणाचा अभाव, शिक्षणाप्रती उदासिनता, दारिद्रयामुळे शिक्षणाकडे न झुकणाऱ्या लोकांचे प्रमाण भारतात अधिक आहे. भारत हा एकमेव देश असा असेल की, ज्यात अडाणी व्यक्ति मंत्री व मुख्यमंत्री (राबडीदेवी) बनतो. अशा माणसाकडे जर प्रगतशील व पुरोगामी किंवा कोणत्याही राज्याची व विभागाची सुत्रे सोपावली तर तो त्या विभागाचे शासन व प्रशासन कसे संभाळेल अशा स्थितीत सत्तेचे संचलन दुसऱ्या व्यक्तिकडून होते. (नौकर वर्ग, पक्षश्रेष्ठी, श्रेष्ठ सहकारी इ.) भारतीय लोकशाहीला यशस्वी बनवण्याठी नागरी समाजाने लोकप्रतिनिधीची शैक्षणिक व इतर पात्रता अणि वयोमर्यादा निश्चित करण्यासाठी लोकजागृती करावी. वर्तमान भारतीय लोकशाहीला सशक्त व

प्रभावी बनवण्यासाठी सर्वसामान्य नागरकांचे लोकशाही व्यवस्थेतील योगदान व सहभाग वाढला प वाढवण्याचे काम नागरि समाजाने करावे. यासाठी आम आदमी जागरुक असावा लागतो. जागरुक ल भ्रष्ट व मदमस्त सत्तेला पायउतार करण्याचे प्रभावी अस्त्र आहे. या अस्त्राला म्यानीतून बाहेर काढून ळाळी राज्यकर्त्या वर्ग आणि भ्रष्ट प्रशासकांच्या नजरेत आणून देण्याचे काम नागरि समाजाने केल्यासच ल सुदृढ व उत्कृष्ट बनते.

**5) लोकसहभागाचा अभाव :**

लोकशाही व नागरी समाज लोक सहभागावरच टिकून असतात. त्यामुळे या दोन्हीना सशक्त व होण्यासाठी लोकसहभागास वाढवावे लागेल. ते ही असा लोक सहभाग असावा की, ज्यात शासनाची भुमि धोरणांना निश्चित करण्याचे धाडस असावे. यासाठी नागरि समाजाच्या सदस्यांना प्रयत्न करावे लागतील. य विकेंद्रीकरण व पारदर्शकतेच्या तत्वाचा अधिक वापर करावा कारण शासन व प्रशासन व्यवस्था जेवढी केंद्र व अपारदर्शी असेल तेवढी त्यात निरंकुशकतेची अधिक शक्यत असते. लोकसहभागाच्या समस्येला कमी व शासन व प्रशासनातील इतर समस्या कमी करण्यासाठी नागरि समाजाला लोकांची स्थानिक , प्रादेशिक व रा स्तरावरच्या शासन व प्रशासनातील सहभागिता वाढवावी लागेल. यासाठी नागरि समाजाने माहिती ानासह लोकनाट्य व लोकगीतासारख्या पारंपारिक साधनांचा वापर करावा. लोकांना त्यांच्या सहभागातून होणा परिवर्तनाची जाण करुन दयावी लागेल. लोकशाहीच्या यशस्वीतेची भिस्त लोकांच्या सहभागावरच अवलं असल्याचे पटवून सांगावे लागेल. लोकसहभागाचे महत्व पटवून दयावे लागेल. नागरि समाजाला स्वतः ची क्रियाशील वाढवावी लागेल.

**6) पारदर्शक निवडणूक व्यवस्था :**

लोकशाहीचा आणि निवडणूकांचा संबंध फार जवळचा आहे. लोकशाहीत सुधारणा करण्यासाठी निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक बनवावी लागेल. निवडणूकात सक्रिय सहभाग घेणे, निवडणूकातुनच आदर्श व मजबुत लोकशाही उभी राहु शकते हे लोकांना पटवून व समजून सांगण्याची जबाबदारी नागरी समाजाची आहे. नागरि समाज निवडणूकांना यशस्वी करण्याचे एक माध्यम बनत आहे. मतदान यंत्रणा पारदर्शक करावी लागेल. माहिती अधिकार, मतदानाचे ओळख पत्र, एक देश एक निवडणूका यासारख्या बाबतीत लोकांना अधिक जागरुक करावे. ज्यामुळे बऱ्याच प्रमाणात निवडणूक यंत्रणातील दोष दुर होतील. निवडणूक यंत्रणेत काम करणाऱ्या नोकरवर्गास प्रशिक्षित करुन त्यांचे मनोधैर्य वाढवणे या कामात शासनाने नागरि समाजाचे सहकार्य घ्यावे. निवडणूक पारदर्शक होण्यासाठी आदर्श आचार संहितांना कायद्याने भक्कम करावे. निवडणूकावर होणारा खर्च सर्व राज्याने उचलावा.

ISSN - 2319 - 8648
ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded

[illegible] करावे. मतदान न करणाऱ्या लोकांच्या अधिकारात [illegible] लागेल. निवडणुकीच्या [illegible] मतदान करताना ओळख पत्राची सक्ती करावी.भारतात लोकशाही शासनव्यवस्था कमकुवत बनवण्यात केवळ मुजोर, दप्तर दिरंगाई, भ्रष्टाचार व लालफितशाहीच्या गर्तेत सापडलेल्या नोकरवर्गाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. नौकरवर्ग हा प्रशिक्षित व शिकलेला असतो. तो राजकीय नेत्यांच्या अज्ञान व अनुभव नसण्याचा फायदा घेवून शासकीय योजनांची अंमलबजावणी व्यवस्थित करत नाही. जनतेला छोट्या छोट्या कामाला अडवणे, त्रास देणे इत्यादी प्रयत्न जाणीवपूर्वक हा वर्ग करतो. स्वतःच्या पदाचा गैरवापर जाणीवपूर्वक हा वर्ग करतो. स्वतःच्या पदाचा गैरवापर जाणीवपूर्वक हा वर्ग करतो. स्वतःच्या पदाचा गैरवापर करुन शासकीय सत्तेचा गैरवापर करतात.

यासाठी नागरि समाजाने पुढाकार घेवून नोकर वर्गाची मानसिकता बदलावी. त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करुन द्यावी.लोकहिताच्या प्रेरणेने काम करणाऱ्या नोकरवर्गाला पुरस्कारीत करुन प्रोत्साहित करावे. शासकीय योजना व धोरणाची चांगली अंमलबजावणी करणारा नोकरवर्ग कसा प्रशासनात येईल ते पहावे. नागरि समाजाने अशा नोकरवर्गास आपल्या चळवळीत सहभागी करुन घ्यावे.

नागरि समाजाची लोकशाहीतील भूमिका वाढत आहे. त्यामुळेच त्यांना लोकशाहीचा तिसरा मार्ग म्हणतात. जो लोकशाहीचे महत्व जाणणारा व मानणारा आहे. लोकशाहीत विकसित होणारा आहे. नागरी समाज लोकशाहीला सशक्त करणारा नवा वाटाडया आहे. या वाटाडयाने आपल्या कामाला अधिक गतीशील करावे. तरच स्वातंत्र्य, समता, न्याय, लोककल्याण, सुरक्षा ही लोकशाहीची आदर्श मुल्य व्यवहारात उतरतील. नागरी समाजाच्या अस्तित्वाला अर्थ मिळेल. नागरि समाजाची लोकप्रियता वाढेल. नागरि समाजाची दिशा लोकशाहीची दशा सुधारण्यात कारणी व्हावी म्हणून आम आदमीने नागरि समाजाची भूमिका समजून घ्यावी. त्यास सकारात्मक हातभार लावावा. लोक मान्यता व जनतेच्या अधिमान्यतेशिवाय लोकशाही आणि नागरि समाज सक्षम होणार नाहीत.

**Key Words (मुख्य शब्द) :**

लोकशाही, नागरि समाज, राजकीय पक्ष, निवडणूक प्रणाली, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, नोकरवर्ग, जागरुकता, भारत, शासन, लोककल्याण, नोकरवर्ग, लोक सहभाग.

**सारांश (Abstract)**

वर्तमान दशकात लोकशाही व नागरि समाजास मानवी विकासाचे ध्येय प्राप्त करण्यासाठी अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. शाश्वत विकास, सर्वांगीण विकास लोक सहभाग सक्षमीकरण पारदर्शकता. नव्या माहिती अधिकार या सर्वांना सोबत घेवून नागरि समाज लोकशाहीला नवी दिशा देण्याचा प्रयत्न करतो.

युगाच्या नव्या गरजा पुर्ण करुन स्वतःची प्रस्तुतता टिकवण्यासाठी आपल्या स्वरुपात सकारात्मक बदल करण्याचा प्रयत्न नागरि समाज व लोकशाही करत आहेत. ज्यामुळे भारतात गुणात्मक , सहभागी व पारदर्शक शासन व्यवस्था व जागरुक लोकमताची स्थापना होईल.

## संदर्भ सूची

1) उच्चस्तर आधुनिक राजनीतिक सिध्दांत - एस.एल. वर्मा- नॅशनल पब्लिशिंग हाऊस जयपूर - 2006

2) लोकप्रशासन - एम. लक्ष्मीकांत - टाटा मॅग्राहिल नई दिल्ली.

3) राजनीति सिध्दान्त की रुपरेखा-ओ.पी. गाबा आगरा

4) भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल - राजकीय धुरीणत्व- वर्चस्व-प्रकाश पवार-डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. 2014

5) राजकारणाचा तरुण चेहरा-लेखिका - आष्टी भारतीय, अनुवाद-सुवर्णा बेडेकर -अमेय इन्सपायरिंग बुक्स,पुणे-2014

6) लोकशाहीचे व्याकरण-अनुवाद शारदा साठे -न्या.पी.बी. सावंत - भाव्य प्रकाशन, मुंबई-2013

7) Re-inventing politics in India-Editors-C.P. Barthowal, S.K.Sharma-IPSA. Rahul Publishing house, Meerut 2015

8) भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण - डॉ. भा.ल.भोळे, पिंपळापुरे पब्लिकेशन अॅण्ड कंपनी, नागपुर.

9) Democracy in India- Chander Prakash Bhambhri

10) आधुनिक राजनीतिक सिध्दांन्त - डॉ. पुखराज जैन, डॉ.बी.एल. फादिया- साहित्य भवन पब्लिकेशन्स

11) वर्चस्व आणि सामाजिक चिकित्सा- गोपाळ गुरु-हरिती पब्लिकेशन्स, पुणे- 2015

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded